15th February, 2021

To
Manager-CRD
**BSE Limited**
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Fort,
Mumbai - 400 001

Dear Sir/Madam,

**Scrip Code: 508954**

**Sub.: Newspaper Publication of notice of Board Meeting under Regulation 47 of the SEBI (Listing of Obligations and Disclosure Requirement) Regulations, 2015.**

With reference to Regulation 47 and other applicable regulations, if any, of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please note that the Unaudited Standalone and Consolidated Financial Results of the Company for the Quarter and nine months ended 31st December, 2020 has been published in Financial Express having nationwide circulation and The Global Times Newspaper circulating in Mumbai on 14th February, 2021.

The copy of the newspapers cuttings is enclosed herewith.

Kindly take the above on your record and acknowledge the receipt of the same.

Thanking you,

Yours faithfully,

**For Finkurve Financial Services Limited**

Finkurve Financial Services Ltd Mumbai

**Sunny Parekh**
**Company Secretary & Compliance Officer**
**M. No. ACS 32611**
Encl.: A/a

# मुंबईत आता भिकारी दिसणार नाहीत!

## पोलिसांनी सुरू केली मोठी मोहीम

मुंबइ : मुंबईतल्या चौकाचौकात किंवा सिग्नलवर आशाळभूत नजरेनं भिक्षा मागणारे भिकारी आता दिसणार नाहीत. कारण मुंबई पोलिसांनी भिकाऱ्यांना पकडण्यासाठी मोठी मोहीम हाती घेतली असून भिकाऱ्यांना पकडून त्यांची चेंबूरमधील भिक्षेकरी स्वीकार केंद्रात सोय करण्यात येत आहे.

मुंबईला भिकारीमुक्त करण्यासाठी मुंबईचे सहपोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) विश्वास नांगरे पाटील (Vishwas Nangare Patil) यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांनी मुंबईतील सर्व पोलीस ठाण्यांच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना पत्र लिहून रस्त्यावर फिरणाऱ्या आणि भिक्षा मागणाऱ्या भिकाऱ्यांविरोधात मोहीम सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. महत्वाची बाब अशी की पकडण्यात येणाऱ्या भिकाऱ्यांची कोरोना चाचणी सुद्धा करण्यात येणार आहे.

भिकाऱ्यांना पकडण्याच्या मोहीमेची सुरुवात देखील झाली असून मुंबईतील आझाद मैदान पोलीस ठाण्याकडून १४ भिकाऱ्यांना पकडून त्यांना भोईवाडा कोर्टात हजर केलं जाणार आहे. त्यासोबतच त्यांची कोरोना चाचणी केल्यानंतर चेंबूर येथील भिक्षेकरी स्विकार केंद्रात त्यांची सोय केली जाणार आहे.

कोर्टात हजर केल्यानंतर कोर्टाच्या निर्देशानुसार पुढील कारवाई केली जाणार आहे. दरम्यान, मुंबई पोलिसांनी सुरू केलेली भिकाऱ्यांविरोधातील मोहित ही संपूर्ण फेब्रुवारी महिना घेतली जाणार आहे.

भिकाऱ्यांविरोधातील कारवाईचं कारण काय?

मुंबईच्या रस्त्यावर अनेकदा भिक्षा मागण्यासाठी लहान मुलांचा वापर केला जातो. लहान मुलांचा वापर करुन सहानभुती मिळवून पैसे कमावणाऱ्यांची भिकाऱ्यांची टोळी मुंबईत विकसीत झाल्याचं समोर आलं आहे. याशिवाय, अनेक लहान मुलांचं अपहरण करुन त्यांना भिक मागायला लावण्याचे प्रकारही घडतात. काहींनी तर मुंबईच्या चौकाचौकात भीक्षेला व्यवसाय बनवला आहे.

# महाराष्ट्रात पुन्हा कोरोना रुग्णांत वाढ

## अमरावतीमध्ये जनुकीय क्रमनिर्धारण चाचण्या

मुंबई : राज्यात उतारणीला लागलेला करोना रुग्णसंख्येचा आलेख या आठवड्यात पुन्हा वर गेला आहे. यात प्रामुख्याने अमरावती जिल्ह्यात आठवडाभरात पाच टक्के रुग्ण वाढले आहेत. अमरावतीमधील १०० रुग्णांचे नमुने जनुकीय क्रमनिर्धारण (जिनोम सीक्वेन्सिंग) चाचण्यांसाठी पाठविले असून याचा अहवाल पुढील आठवड्यात येणार आहे.

राज्यात शुक्रवारी दिवसभरात तीन हजार ६७० नव्या रुग्णांचे निदान झाले. तर दोन हजार ४२२ रुग्ण बरे होऊन घरी परतले. राज्यात जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत हा आलेख घसरत अडीच हजारांपर्यंत आला होता.

फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यापासूनच यात पुन्हा वाढ होत असल्याचे दिसून आले. मागील चार दिवसांपासून तर दर दिवशी नव्याने निदान होणाऱ्या रुग्णांची संख्या सुमारे तीन ते साडेतीन हजारांपर्यंत पोहोचली आहे.

अमरावती शहर आणि ग्रामीण भागात फेब्रुवारीपासून रुग्णसंख्या झपाट्याने वाढत आहे. २९ जानेवारी ते ४ फेब्रुवारी या आठवड्यात अमरावती महानगरपालिकेत ६९०, तर ग्रामीणमध्ये २७८ रुग्णांचे नव्याने निदान



झाले होते, तर ५ ते ११ फेब्रुवारी या आठवड्यात हे प्रमाण अनुक्रमे १०७८ आणि ३६० वर पोहोचले आहे. अमरावती शहरात आठवडाभरात सुमारे सात टक्के, तर ग्रामीणमध्ये सुमारे चार टक्के रुग्णवाढ झाली आहे. झपाट्याने वाढलेल्या संसर्गामागे नवकरोनाचे विषाणू कारणीभूत आहे का याची पडताळणी करण्यासाठी बाधितांचे नमुने जनुकीय क्रमनिर्धारणासाठी पाठविण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. त्यानुसार जिल्ह्यात तपासण्या सुरू केल्या आहेत.

अमरावती शहरी भागात रुग्ण मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. एका वेळी संपूर्ण कुटुंबच पूर्ण बाधित असल्याचे तपासणीत दिसून येत आहे. या दृष्टीने अधिक अभ्यास करण्यासाठी चार दिवसांत राज्याचे आरोग्य अधिकारी येणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रानमाळे यांनी दिली.

## राज्यातील इतर महापालिकांतील स्थिती


अकोला ग्रामीण भागातही रुग्णवाढ झाल्याचे आढळले असून दर आठवड्याला नव्याने निदान होणाऱ्या रुग्णांची संख्या ७४ हून ११३ वर पोहोचली आहे, तर वर्धामध्ये २५२ हून २८१ पर्यंत वाढली आहे. दर आठवड्याला एक हजाराहून अधिक रुग्णसंख्या आढळणाऱ्या जिल्ह्यांमध्ये सध्या मुंबईसह ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर आणि अमरावती जिल्ह्यांचा समावेश आहे. सोलापूर, मिरज, औरंगाबाद, परभणी, नांदेड, वर्धा, पनवेल, धुळे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या भागांतही या आठवड्यात रुग्ण वाढले आहेत.

राज्यात ज्या भागांमध्ये आधी संसर्ग प्रसार अधिक झाला नव्हता तिथे आता संसर्ग होताना दिसत आहे. प्रतिबंधाच्या दृष्टीने चाचण्या आणि संपर्कातील व्यक्तींचा शोध यावर भर देण्याचे आदेश दिले आहेत. अमरावतीमधील १०० बाधितांचे नमुने जनुकीय क्रमनिर्धारणासाठी पाठविले आहेत. याचे अहवाल या आठवड्यात येतील.

– डॉ. तात्याराव लहाने, वैद्यकीय संशोधन आणि संचालनालयाचे संचालक

# वनमंत्री संजय राठोड अडचणीत

## पूजा चव्हाण आत्महत्येप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची भाजपची मागणी



मुंबई : बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथील तरुणी पूजा चव्हाण हिने पुण्यात केलेल्या कथित आत्महत्येप्रकरणात विविध माध्यमांमध्ये व समाजमाध्यमांवर सुरू असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी रात्री भाजपने थेट शिवसेनेचे वनमंत्री संजय राठोड यांचे नाव घेतल्याने राठोड यांच्याबरोबरच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासमोर नवे राजकीय संकट निर्माण झाले.

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी कुणाचे नाव न घेता चौकशीची मागणी करणारे पत्र पोलीस महासंचालकांना दिले असताना या प्रकरणात वनमंत्री संजय राठोड यांच्यावर गुन्हा दाखल करा, अशी थेट मागणी भाजपच्या प्रदेश उपाध्यक्ष चित्रा वाघ यांनी केली.

पूजा चव्हाण आत्महत्या प्रकरणात समाजमाध्यमांमध्ये ध्वनिफितीसुद्धा फिरत आहेत. त्यामुळे बंजारा समाजात प्रचंड अस्वस्थता असून याप्रकरणी सखोल चौकशी करण्याची मागणी विधानसभेतील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस महासंचालकांकडे पत्र पाठवून केली.

फडणवीस यांनी कोणाचेही नाव घेणे टाळले असताना शुक्रवारी रात्री भाजपच्या प्रदेश उपाध्यक्ष चित्रा वाघ यांनी संजय राठोड यांचे थेट नाव घेत त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. पूजा चव्हाण आत्महत्या प्रकरणात समोर आलेल्या सगळ्या तपशिलांचा रोख शिवसेनेचे वनमंत्री संजय राठोड यांच्याकडे जातो. पोलिसांनी स्वतः (स्यु-मोटोतंर्गत) तक्रार दाखल करत संजय राठोड यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, असे चित्रा वाघ यांनी म्हटले आहे.

### कुटुंबीयांकडून तक्रार नाही!

भाजप आमदार व मुंबई प्रभारी अतुल भातखळकर यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र लिहून या प्रकरणी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.मागील महिन्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर एका महिलेच्या प्रकरणात आरोप झाले व नंतर त्या महिलेविरोधात अनेक राजकारण्यांनी तक्रार के ल्यावर वातावरण शांत झाले होते. आता पूजा चव्हाण आत्महत्या प्रकरणामुळे संजय राठोड यांच्या रूपाने महाविकास आघाडी सरकारमधील अन्य एका पक्षाचा दुसरा मंत्री अडचणीत आला आहे.
पूजा चव्हाण आत्महत्याप्रकरणी तिच्या कुटुंबीयांकडून कोणतीही तक्रार देण्यात आलेली नाही. याप्रकरणात पोलिसांनी अकस्मात मृत्यू अशी नोंद केली आहे, अशी माहिती परिमंडळ पाचच्या पोलीस उपायुक्त नम्रता पाटील यांनी दिली.
बीड जिल्ह्यातील परळी येथील पूजा लहू चव्हाण (वय २२, पुण्यातील पत्ता- हेवन पार्क, महंमदवाडी) या युवतीने आत्महत्या केल्याची घटना हडपसरजवळील महंमदवाडी परिसरात असलेल्या उच्चभ्रू सोसायटीत नुकतीच घडली.

# गोस्वामींना दिलासा तूर्तास कायम

## कंपनीच्या नव्या कागदपत्रांवर सरकारचे लवकरच उत्तर

मुंबई : टीआरपी घोटाळाप्रकरणी रिपब्लिक वाहिनीचे मुख्य संपादक अर्णब गोस्वामी आणि वाहिनीची मालकी असलेल्या एआरजी आऊटलियर कंपनीच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना पोलीस कारवाईपासून मिळालेला दिलासा तूर्तास कायम राहिला आहे. याबाबत उच्च न्यायालय ५ मार्च रोजी निर्णय देण्याची शक्यता आहे.

मुंबई पोलिसांच्या तपासाविरोधात गोस्वामी, रिपब्लिक वाहिनी आणि कंपनीने उच्च न्यायालयात याचिका केली आहे. तसेच पोलिसांच्या आरोपपत्राला आव्हान देताना अनेक नव्या कागदपत्रांचा आधार घेत दिलासा देण्याची मागणी केली आहे. त्यावर उत्तर दाखल करणार असल्याचे राज्य सरकारतर्फे न्यायालयाला सांगण्यात आले.

न्यायमूर्ती एस. एस. शिंदे आणि न्यायमूर्ती मनीष पितळे यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. त्या वेळी राज्य सरकारतर्फे विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी कंपनीने दिलासा मागताना आधार घेतलेल्या नव्या कागदपत्रांबाबत उत्तर दाखल करण्यासाठी वेळ देण्याची विनंती न्यायालयाला केली. पुढील सुनावणीपर्यंत गोस्वामी आणि कंपनीच्या कर्मचाऱ्यांवर कोणतीही कठोर कारवाई करणार नसल्याचे सिब्बल यांनी सांगितल्यावर न्यायालयाने याचिकेवरील सुनावणी ५ मार्चपर्यंत तहकूब केली. त्या वेळी याचिकाकर्त्यांना अंतरिम दिलासा द्यायचा की नाही याबाबत दूरचित्रसंवादाच्या माध्यमातून सुनावणी घेण्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.

या प्रकरणाचा तपास सीबीआय किंवा स्वतंत्र यंत्रणेकडे वर्ग करण्याच्या मुख्य मागण्यांवर १६ मार्चला प्रत्यक्ष सुनावणी घेणार असल्याचेही न्यायालयाने या वेळी स्पष्ट केले.

# ठाण्यात शिवसेना आणि काँग्रेस नगरसेवकांमध्ये वाद

## अर्थसंकल्पीय चर्चा बैठकीदरम्यानचा प्रकार

ठाणे : राज्यात एकत्रित सत्तेवर असलेले शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी हे तिन्ही पक्ष ठाणे महापालिकेत मात्र एकमेकांविरोधात भूमिका घेत असल्याचे चित्र असतानाच, शुक्रवारी स्थायी समितीच्या अर्थसंकल्पीय चर्चेच्या बैठकीत शिवसेना आणि काँग्रेस नगरसेवकांमध्ये बाचाबाची झाल्याचा प्रकार घडला. खुर्ची फेकण्यापर्यंत हा वाद टोकाला गेला होता. मात्र, त्याआधीच भाजप नगरसेवकाने मध्यस्थी केल्याने दोन्ही नगरसेवकांमधील वाद मिटला.

ठाणे महापालिकेच्या अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी स्थायी समितीची विशेष बैठक गेल्या दोन दिवसांपासून सुरू आहे. या बैठकीमध्ये शुक्रवारी काँग्रेसचे नगरसेवक विक्रांत चव्हाण यांनी जुन्या अर्थसंकल्पाबाबत माहिती देण्याचा आग्रह धरला. तसेच जमा-खर्चाची आकडेवारी देण्याची मागणी केली.

# जव्हार येथे हिल स्टेशन विकसित करणार- मुख्यमंत्री

जव्हार : पर्यटनाच्या दृष्टीने जिल्ह्याची भौगोलिक रचना अनुकूल आहे. जिल्ह्याला विस्तीर्ण सागर किनारा लाभला आहे. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी पर्यटनस्थळांचा विकास करणे आवश्यक असून, त्या माध्यमातून जिल्ह्याचा विकास साधणार असल्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

नव्याने जिल्हा अस्तित्वात आल्याने जिल्ह्यासाठी लागणाऱ्या आवश्यक सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, तसेच जिल्हा परिषदेच्या इमारतीचे काम लवकरच पूर्ण होऊन नागरिकांसाठी उपलब्ध होणार आहे.कुपोषण पूर्णपणे थांबवायचे असल्याने, जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्यात आला आहे.

## SPARC SYSTEMS LTD

**Reg off :** Plot No 11 Survey No 118-1 & 2 ,Village Pundhe Shahpur Dist Thane At Post Atgaon 421301 **website: www.sparcsys.com E-mail: sparc@mtnl.net.in,**
**CIN: L72100MH1989PLC053467**
**Extract of standalone UnAudited Financial Results for the quarter and nine months ended 31.12.2020**
**Rs. in Lakh**

| Particulars | Quarter Ended 31.12.2020 (UnAudited) | Quarter Ended 31.12.2019 (UnAudited) | Half year Ended 31.03.2020 (Audited) |
|---|---|---|---|
| Total income from operations | - | - | 8.86 |
| Net Profit / (Loss ) (before tax and/or extraordinary items) | (1.48) | (1.22) | (1.20) |
| Net Profit / (Loss) Before tax (after extraordinary items) | (1.48) | (1.22) | (1.20) |
| Net Profit / (Loss) for the period after tax (after Extraordinary items) | (1.48) | (1.22) | (1.20) |
| Equity Share Capital (Face Value of the shares Rs 10/-) | 496.85 | 496.85 | 496.85 |
| Reserves (excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of previous year) | - | - | (151.67) |
| **Earnings Per Share (before extraordinary items) (of Rs 10/- each)** | | | |
| Basic : | (0.03) | (0.02) | (0.02) |
| Diluted: | (0.03) | (0.02) | (0.02) |
| **Earnings Per Share (after extraordinary items) (of Rs 10 /- each)** | | | |
| Basic : | (0.03) | (0.02) | (0.02) |
| Diluted : | (0.03) | (0.02) | (0.02) |

**Note:**
1. The above Standalone unaudited financial results for the quarter and nine months ended 31.12.2020 have been reviewed by Auditors, Audit Committee in their meeting held on 13th February, 2021 and have been approved by the Board of Directors in their meeting held on 13th February, 2021.
2. The above is an extract of the detailed format of year ended Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the quarter and year ended Financial Results are available on the Stock Exchange websites. (www.bseindia.com) and on the Company's website (www.sparcsys.com.)

**For SPARC SYSTEMS LTD.**
**Sd/-**
**J T D'souza**
**Managing Director**
**DIN 00958844**

**Place : Mumbai**
**Date: 13/02/2021**

## KONARK कोणार्क सिंथेटिक लिमिटेड

सीआयएनः एल१७२००एमएच१९८४पीएलसी०३३४५१
नोंदणी. कार्यालयः मित्तल इंडस्ट्रीयल इस्टेट, इमारत क्र. ७, अंधेरी कुर्ला रोड, साकीनाका, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०५९
दूर क्र.: ०२२ - ४०८९ ६३००; ई-मेल आयडीः info@konarkgroup.co.in; संकेतस्थळः www.kokangroup.co.in
३१.१२.२०२० रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि नऊ महिन्यांसाठीएकमेव आणि एकत्रिकृत अलेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षाचा आराखडा
(रु. लाखांमध्ये – ईपीएस वगळता)

| तपशिल | एकमेव | | | एकत्रिकृत | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संपलेले त्रैमासिक ३१.१२.२०२० अलेखापरीक्षित | संपलेले वर्ष ३१.१२.२०२० अलेखापरीक्षित | संपलेले त्रैमासिक ३१.१२.२०१९ अलेखापरीक्षित | संपलेले त्रैमासिक ३१.१२.२०२० अलेखापरीक्षित | संपलेले वर्ष ३१.१२.२०२० अलेखापरीक्षित | संपलेले त्रैमासिक ३१.१२.२०१९ अलेखापरीक्षित |
| कार्यामधून एकूण उत्पन्न (निव्वळ) | २१६.४१ | ३४८.४१ | १,८७३.२१ | २१६.४१ | ३४८.४१ | १८७३.२१ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (कर, अपवादात्मक आणि अतिविशिष्ट बाबींपूर्व) | (११२.२३) | (१,३८७.६३) | (४१८.३९) | (१७४.४६) | (१५७४.५१) | (१४६०.२९) |
| कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (कर, अपवादात्मक आणि अतिविशिष्ट बाबींपूर्व) | (११२.७१) | ४६४.९५ | (४१८.३९) | (१५९.०४) | २८६.०२ | (१४५७.१८) |
| कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (कर, अपवादात्मक आणि अतिविशिष्ट बाबींपश्चात) | (११२.७१) | ४६४.९५ | (४१८.३९) | (८६.४७) | ३५८.५९ | (१४५७.१८) |
| समभाग भांडवल | ५८०.८० | ५८०.८० | ५८०.८० | ५८०.८० | ५८०.८० | ५८०.८० |
| राखीव (गत वर्षाच्या ताळेबंदामध्ये दाखविल्यानुसार पुंरामुल्यांकित राखीव वगळता राखीव) | - | - | - | - | - | |
| प्रती भाग उत्पन्न (रु. १०/- प्रत्येकीचे) (वार्षिकीकरण नाही) | | | | | | |
| (i) मूळ | (१.९४) | ८.०१ | (७.२०) | (१.४९) | ६.१७ | (२५.०९) |
| (ii) सौम्यिकृत | (१.९४) | ८.०१ | (७.२०) | (१.४९) | ६.१७ | (२५.०९) |

टिपः सेबी (लिस्टिंग ऑब्लिईगेशन अॅण्ड डिसक्लोझर रिक्वायरमेंट रेग्युलेशन) नियमावली, २०१५ च्या ३३ च्या अनुषंगाने स्टॉक एक्सचेंजमध्ये सादर करावयाच्या त्रैमासिक आणि वर्षासाठी वित्तिय निष्कर्षाचा उपरोक्त हा सविस्तर आराखडा आहे. त्रैमासिक वित्तिय निष्कर्षाचा पूर्ण आराखडा स्टॉक एक्स्चेंज च्या म्हणजेच (www.bseindia.com) आणि कंपनीच्या (www.konarkgroup.co.in) ह्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

संचालक मंडळासाठी आणि त्यांच्या वतीने
कोणार्क सिंथेटिक लिमिटेड करीता
सही/-
अमिताभ केजरीवाल
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएनः ०००५८६४

ठिकाणः मुंबई
दिनांकः १३.०२.२०२१

## टुनी टेक्स्टाईल मिल्स लिमिटेड

सीआयएनः एल१७१२०एमएच१९८७पीएलसी०४३९९६
नोंदणी. कार्यालयः ६३/७१, दादीशेठ आग्यारी लेन, ३ रा मजला, काळबादेवी रोड, मुंबई – ४०० ००२
ईमेल : info@tunitextiles.com, संकेत : www.tunitextiles.com
३१ डिसेंबर २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि नऊ महिन्यांसाठी अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचे निवेदन
रु. लाखांमध्ये

| अनु. क्र. | तपशील | संपलेले त्रैमासिक ३१ डिसेंबर २०२० अलेखापरिक्षित | संपलेले त्रैमासिक ३० डिसेंबर २०१९ अलेखापरिक्षित | संपलेले नऊ महिने ३० डिसेंबर २०२० अलेखापरिक्षित | संपलेले वर्ष ३१ मार्च २०२० लेखापरिक्षित |
|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यामधून एकूण उत्पन्न (निव्वळ) | २४१.६३ | १,१८९.३५ | २९४.७० | २.५८२.५७ |
| २ | करपूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा/तोटा (कर /अपवादात्मक आणि/किंवा अतिविशीष्ट बाबीपूर्व | ५०.८२ | १०.१३ | (४४.३८) | (११.२२) |
| ३ | करपूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा/तोटा (अपवादात्मक आणि/किंवा अतिविशीष्ट बाबीनंतर | ५०.८२ | १.१३ | (४४.३८) | (११.२२) |
| ४ | करनंतर कालावधीसाठी निव्वळ नफा/तोटा (अपवादात्मक आणि/किंवा अतिविशीष्ट बाबीनंतर | ३७.३७ | १.०० | (३५.९४) | (३०.३६) |
| ५ | कालावधीसाठी एकूण सर्वंकष उत्पन्न[कालावधीसाठी एकत्रीत नफा/(तोटा) (करनंतर) आणि सर्वंकष उत्पन्न (करनंतर)] | ३७.४२ | १.५१ | (३५.७७) | (३०.१५) |
| ६ | भरणा केलेले समभाग भाडवल (रु१/- प्रत्येकीचे दर्शनी मुल्य/ | १,३०६.३१ | १,३०६.३१ | १,३०६.३१ | १,३०६.३१ |
| ७ | अन्य भाग धारणा | | | | (१००.५१) |
| ८ | प्रतीभाग उत्पन्न (अतिविशीष्ट बाबीपूर्व) रु १/- प्रत्येकीचे ( खंडित आणि अखंडित कार्यामधून) | | | | |
| | (i) ए) मूळ | ०.०३ | ०.०० | (०.०३) | (०.०२) |
| | बी) सौम्यीकृत | ०.०३ | ०.०० | (०.०३) | (०.०२) |

टिपाः सेबी एलओडीआर नियमावली, २०१५ च्या ३३च्या अनुषंगाने स्टॉक एक्सचेंजमध्ये सादर करावयाच्या ३१ डिसे २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिक वित्तीय निष्कर्षाचा उपरोक्त हा सविस्तर आराखडा आहे. ३१ डिसेंबर २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिकाच्या त्रैमासिकवित्तीयनिष्कर्षाचापूर्णआराखडास्टॉकएक्सचेंजच्या म्हणजेचwww.bseindia.comह्या संकेतस्थळावरआणि कंपनीचे संकेतस्थळःwww.tunitextiles.com” वर उपलब्ध आहे.

टुनी टेक्स्टाईल मिल्स लिमिटेड
सही/-
नरेंद्र के. सुरेखा
व्यवस्थापकीय संचालक

ठिकाण : मुंबई
दिनांक : फेब्रुवारी १३,२०२१

## FINKURVE FINANCIAL SERVICES LIMITED

**(CIN: L65990MH1984PLC032403)**
Regd. Office: 3rd Floor, Bullion House, 115, Tambakatta Lane, Zaveri Bazar, Mumbai - 400 003
Tel No: 022-6142 0022, Email id: finkurvefinancial@gmail.com, Website: www.arvog.com
**EXTRACT OF STATEMENT OF UNAUDITED STANDALONE & CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR QUARTER AND NINE MONTHS YEAR ENDED 31ST DECEMBER, 2020 (Rs. in Lacs)**

| Sr. No. | Particulars | STANDALONE | | | | | | CONSOLIDATED | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | QUARTER ENDED | | | NINE MONTHS ENDED | | YEAR ENDED | QUARTER ENDED | | | NINE MONTHS ENDED | | YEAR ENDED |
| | | 31.12.2020 UNAUDITED | 30.09.2020 (Unaudited) | 31.12.2019 UNAUDITED | 31.12.2020 UNAUDITED | 31.12.2019 UNAUDITED | 31.03.2020 (Audited) | 31.12.2020 UNAUDITED | 30.09.2020 (Unaudited) | 31.12.2019 UNAUDITED | 31.12.2020 UNAUDITED | 31.12.2019 UNAUDITED | 31.03.2020 (Audited) |
| 1 | Total Income (Net) | 359.66 | 553.57 | 369.46 | 1439.50 | 831.56 | 1,637.95 | 604.42 | 743.78 | 671.57 | 1983.28 | 1409.73 | 2,482.95 |
| 2 | Profit / (Loss) from Ordinary Activities after tax (9 - 10) | -78.07 | 244.59 | 98.85 | 331.34 | 226.44 | 402.96 | (42.85) | 248.80 | 167.95 | 359.04 | 279.12 | 406.68 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Extraordinary items) | -78.07 | 244.59 | 98.85 | 331.34 | 226.44 | 402.96 | (42.85) | 248.80 | 167.95 | 359.04 | 279.12 | 406.68 |
| 4 | Paid-up Equity Share Capital (face value Rs 1/- each ) | 1,268.58 | 1,268.58 | 1084.37 | 1,268.58 | 1084.37 | 1268.58 | 1,268.58 | 1,268.58 | 1084.37 | 1,268.58 | 1084.37 | 1268.58 |
| 5 | Reserves (excluding revaluation reserve as shown in the Balance Sheet of previous year) | - | - | - | - | - | 11875.25 | - | - | - | - | - | 12055.36 |
| 6 | Earning per share (of Rs. 1/- each) | | | | | | | | | | | | |
| | a) Basic and Diluted EPS (before Extraordinary items) (in Rs.) | (0.06) | 0.19 | 0.09 | 0.26 | 0.21 | 0.36 | (0.04) | 0.20 | 0.15 | 0.28 | 0.26 | 0.36 |
| | b) Basic and Diluted EPS (after Extraordinary items) (in Rs.) | (0.06) | 0.19 | 0.09 | 0.26 | 0.21 | 0.36 | (0.04) | 0.20 | 0.15 | 0.28 | 0.26 | 0.36 |

**Note:-**
The above is an extract of the detailed format of Quarterly / Annual Financial Results filed with the Stock Exchange under regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly / Annual Financial Results are available on the Company's website i.e. www.arvog.com and the Stock Exchange website i.e. www.bseindia.com.

**For Finkurve Financial Services Limited**
**Sd/-**
**Narendra Jain**
**Executive Director**
**DIN : 08788557**

**Place : Mumbai**
**Date : 13th February, 2021**

## GENERIC ENGINEERING CONSTRUCTION AND PROJECTS LIMITED

**Regd Off.**: 201 & 202, Fitwell House, 2nd Floor, Opp Home-Town, LBS Road, Vikhroli (West), Mumbai - 400083.
CIN: L45100MH1994PLC082540, Phone No: 9167720671/022-25780272 Website: www.gecpl.com, Email Id: geninfo@gecpl.com
**EXTRACT OF UN-AUDITED STANDALONE FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 31st DECEMBER, 2020**
**(Rs in Lakhs Except EPS)**

| Sl. No. | Particulars | STANDALONE | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarterly | | Nine Months ending 31/12/2020 (Unaudited) | Nine Months ending 31/12/2019 (Unaudited) | Year ended 31/03/2020 (Audited) |
| | | 31/12/2020 (Unaudited) | 31/12/2019 (Unaudited) | | | |
| 1. | Total Income | 3,651.21 | 4,090.54 | 7,600.37 | 15,108.63 | 20,123.14 |
| 2. | Net Profit/ Loss for the period before Tax, Exceptional and/or Extraordinary items | 155.64 | 407.47 | (453.71) | 1,547.37 | 1,929.97 |
| 3. | Net profit/(Loss) for the period before Tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 155.64 | 407.47 | (453.71) | 1,547.37 | 1,929.97 |
| 4. | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 145.42 | 282.58 | (394.71) | 1,067.80 | 1,453.61 |
| 5. | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 145.42 | 282.58 | (394.71) | 1,067.80 | 1,453.61 |
| 6. | Equity Share Capital | 2,106.97 | 2,106.97 | 2,106.97 | 2,106.97 | 2,106.97 |
| 7. | Face Value per share (In Rs) | 5 | 5 | 5 | 5 | 5 |
| 8. | Earnings Per Share (for continuing and discounted operations) | | | | | |
| 1. | Basic: | 0.34 | 0.69 | (0.94) | 2.62 | 3.52 |
| 2. | Diluted: | 0.34 | 0.69 | (0.94) | 2.62 | 3.52 |

**Note:-**
1) The above results have been prepared in accordance with Indian Accounting Standards ("IND AS") notified under section 133 of the Companies Act, 2013 read together with the Companies (Indian Accounting Standards) Rules 2015
2) The above is an extract of the detailed format of Quarterly and Annual Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly and Annual Financial Results are available on the websites of the Stock Exchange and the Company. (http://www.bseindia.com and www.gecpl.com)

**FOR GENERIC ENGINEERING CONSTRUCTION AND PROJECTS LIMITED**
**Sd/-**
**Jayesh Rawal**
**Executive Director**
**DIN: 00464313**

**Place: Mumbai.**
**Date: 13/02/2021**